# मेट्रो-३पुढे काम पूर्णत्वाचे आव्हान

## पहिल्या टप्प्यातील प्रणालीची कामे १५ टक्के बाकी

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

- मेट्रो-३ ही मुंबईतील महत्त्वाची परिवहन सेवा
- एप्रिलमध्ये पहिला टप्पा सुरू करण्याचे लक्ष्य



आरे-कफ परेड या भुयारी मेट्रो-३च्या प्रकल्पाचे काम पुढील महिन्यात पूर्ण होणे अपेक्षित आहे. या मेट्रोची प्रतीक्षा केली जात आहे. परंतु या भुयारी मार्गिकेसमोर पाच टक्के काम पूर्ण करण्याचे आव्हान आहे. या मेट्रो प्रकल्पातील पहिल्या टप्पा सुरू करण्याची नितांत गरज असताना अद्यापही त्यातील कामे अपूर्ण आहेत. विशेषतः प्रणालीशी निगडित कामे १५ टक्के बाकी असल्याचे धक्कादायक चित्र आहे.

'कुलाबा-वांद्रे-सीप्झ' या नावे ओळखली जाणारी मेट्रो-३ ही मुंबईतील अतिशय महत्त्वाची परिवहन सेवा ठरणार आहे. ही मेट्रो पश्चिम उपनगरांना उत्तरेकडे आरे ते दक्षिणेकडे कफ परेड अशी बीकेसी, धारावी, दादर, काळबादेवी, सीएसएमटीमार्गे जोडणार आहे. या मार्गिकेचा पहिला टप्पा आरे ते प्राप्तिकर कार्यालय (बीकेसी) असा असेल. आधीच दोन वर्षे विलंब झाल्यानंतर हा टप्पा डिसेंबर २०२३ पर्यंत सुरू होणे अपेक्षित होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यासंबंधी घोषणाही केली होती. मात्र डिसेंबरची कालमर्यादा हुकल्याने आता ही मार्गिका एप्रिलमध्ये सुरू करण्याचे उद्दिष्ट आखण्यात आले आहे. परंतु त्यासाठी या पहिल्या टप्प्यातील कामेच अद्याप पूर्ण झालेली नाहीत.

ही मार्गिका मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून (एमएमआरसी) उभारण्यात येत आहे. एमएमआरसीनुसार, पहिल्या टप्प्यातील रूळ, भुयारीकरण व स्थानकांची कामे १०० टक्के पूर्ण झाली आहेत. एकूण स्थानक उभारणी ९८ टक्के व डब्यांना वीज पुरविणाऱ्या ओएचई प्रणालीची कामे ९२ टक्के पूर्ण झाली आहेत. मात्र प्रणालीशी निगडित कामे अद्यापही ८५ टक्केच पूर्ण झाली आहेत. हे सर्व बघता सरासरी ९५ टक्के कामे पूर्ण झाली असून महिनाभरात पाच टक्के कामे पूर्ण करण्याचे आव्हान एमएमआरसीसमोर आहे.

### संगणकीय तंत्रज्ञानाने सज्ज

या मार्गिकेतील पहिल्या टप्प्यात प्रत्येकी आठ डब्यांच्या नऊ गाड्या आहेत. या सर्व गाड्या अत्याधुनिक व चालकविरहित असून संगणकीय तंत्रज्ञानाने सज्ज असेल. त्यामुळे मार्गिकेतील प्रणालीशी निगडित कामे अत्यावश्यक असतील. नेमकी हीच कामे १५ टक्के अपूर्ण आहेत. या मेट्रोच्या पहिल्या टप्प्यात एकूण दहा स्थानकांचा समावेश आहे.

# येणाऱ्या

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

विमानतळावर आगमन होणाऱ्या विमानांचा मार्ग सांगणारी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील 'हवाई वाहतूक रडार स्वयंचलित प्रणाली' गुरुवारी दुपारी अचानक बंद झाली. त्यामुळे ८०हून अधिक उड्डाणांना एक ते दीड तासाचा विलंब झाला.

'मुंबईच्या या विमानतळावर आगमन होणाऱ्या विमानांची इत्थंभूत माहिती सांगणारी 'रेथिआन' ही यंत्रणा कार्यान्वित आहे. याद्वारे विमान कुठल्या दिशेने, कुठल्या विमानतळावरून, किती उंचीवरून, किती वेगाने मार्गक्रमण करीत आहे, हे कळू शकते. ही माहिती हवाई नियंत्रण कक्षाला मिळाली की, त्यानुसार तळावर उभ्या असलेल्या विमानांना योग्य दिशेने उड्डाण करण्यास

## धारावीतील बेकायदा बांधकामांवर हातोडा

**मुंबई :** धारावीच्या पुनर्विकासासाठी १८ मार्चपासून पात्रते सर्वेक्षण करण्यात येणार आहे. तत्पूर्वी येथील बेकायदा बांधकामांवर बुलडोझर चालवण्यात येत आहे. धारावीतील चमडा बाजार येथील काही अवैध बांधकामे पालिकेने गुरुवारी भुईसपाट केली.

पुनर्विकासाच्या पार्श्वभूमीवर मागील काही महिन्यांपासून धारावीत अनधिकृत बांधकामांचे पेव फुटल्याचे आढळून आले आहे. या बांधकामांवर पालिकेने कारवाई सुरू केली आहे. पालिकेच्या परिमंडळ दोनचे उपायुक्त प्रशांत सपकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी ही कारवाई करण्यात आली. पाच अधिकारी, ५० कामगार, दोन गॅस कटरचा वापर करण्यात आला. या कारवाईसाठी धारावी व शाहूनगर पोलिसांचे संरक्षण घेण्यात आले होते.